नि. फौजदारी खटला क्र. <u>९६/२०२४</u>
सरकार विरूद्ध शितल नितीन व अन्य एक
**निशाणी १६**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ ची जबानी</u>**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

| | |
|---|---|
| माझे नाव | : हरिशचंद्र गोपाळराव कोकाटे |
| वय | : ६७ वर्षे, |
| धंदा | : शेती काम, |
| राहणार | : रूईखेड, ता. अकोट, जि. अकोला. |

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. ओ. गाडेकर यांचेमार्फत —**

आरोपी क्र. १ माझी पुतणसुन असुन आरोपी क्र. २ हा पुतण्या आहे. मला घटनेची तारिख आठवत नाही. आरोपींसोबत माझी केवळ बोलाचाल झाली होती. याव्यतिरीक्त काहीही घडले नाही. मी आरोपींविरूध्द फिर्याद दिली होती. आता मला मी दिलेली फिर्याद दाखवली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मात्र मला माहित नाही. आता मला प्रथम खबर अहवाल दाखवला. त्यावर देखील माझी सही आहे. मला त्यातील मजकुर माहित नाही. पोलीसांनी मला विचारपुस करून माझे बयान नोंदवले नव्हते.

***(साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)***

२. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला विचारपुस करून माझे बयान नोंदवले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०८/०२/२०२४ सकाळी ०७:०० वाजता मी माझे पत्नी सुर्यकांता

हिच्या नावाने नमुद असलेल्या घरी शौचालयात शौचास गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी त्याठिकाणी शौचास आलो या कारणाने आरोपींनी माझेसोबत वाद केला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ हिने मला दगड मारून माझे डोक्याला दुखापत केली होती व दोन्ही आरोपींनी मिळुन मला शिवीगाळ केली होती.

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींसोबत न्यायालयाबाहेर आपसांत तडजोड झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला सदर प्रकरण पुढे चालवणे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींनी वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — आरोपीतर्फे ॲड. डी. डी. वर्मा यांच्यामार्फत नाकारण्यात आली.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. २०.०१.२०२६ (ए.ए. माळी)
अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्या.क्र. २) अकोट, जि. अकोला.